आकाशवाणी नागपूर

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

सोमवार दिनांक ०२ मार्च २०२६

ठळक बातम्या

- २०३० पर्यंत व्यापार ५० अब्ज डॉलरपर्यंत वाढवण्यावर भारत आणि कॅनडा यांच्यात सहमती.
- पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर सर्व राज्यांना सावधगिरी बाळगण्याचं केंद्रांचं आवाहन.
- नागपूरच्या एसबीएल एक्सप्लोसिव्ह कंपनीत झालेल्या स्फोटात मृत्यूंची संख्या **19** वर, दोषींवर कारवाईचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आश्वासन.
- नागपूर महानगरपालिकेचा इतिहास वैभवशाली - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं प्रतिपादन.
- होळीच्या सणाचा सर्वत्र उत्साह, आज संध्याकाळी पारंपरिक होलिका दहन संपन्न होणार.

<u>भारत-कॅनडा</u>

भारत आणि कॅनडा यांच्यातला व्यापार २०३० पर्यंत ५० अब्ज डॉलरपर्यंत वाढवण्याचा निर्णय दोन्ही देशांनी घेतला आहे. दोन्ही देशांमधला सर्वंकष व्यापार करार पूर्ण करण्यावरही सहमती झाल्याची माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नी यांच्यासोबत नवी दिल्लीत चर्चा केल्यावर ते वार्ताहरांना संबोधित करत होते. दोन्ही देशातल्या व्यापार करारामुळं दोन्ही देशांमध्ये गुंतवणूक आणि रोजगाराच्या संधी वाढतील असं प्रधानमंत्री म्हणाले.

<u>***Critical Minerals*** *पर आज हुआ* ***MoU Resilience Supply Chain*** *को मजबूती देगा। स्पेस सेक्टर में हम दोनों देशों के स्टार्टअप और इंडस्ट्रीज को जोड़ेंगे। ऊर्जा के क्षेत्र में हम नेक्स्ट जनरेशन पार्टनरशिप बना रहे हैं। जिसमें* ***Hydrocarbon*** *के साथ साथ* ***Renewable Energy, Green Hydrogen*** *और*</u>

***Energy Storage** पर विशेष बल दिया जाएगा। हमें खुशी है कि कॅनडा ने **International Solar Alliance** और **Global Biofuel Alliance** से जुड़ने का निर्णय लिया है।*

भारत आणि कॅनडा संरक्षण संवाद स्थापन करण्यावर दोन्ही देशांमध्ये सहमती झाली. तसंच यावर्षी संयुक्तपणे नवीकरणीय ऊर्जा परिषद आयोजित केली जाणार आहे. दोन्ही देशांमधली विविध विद्यापीठांमध्येही याप्रसंगी विविध करार झाले. दहशतवाद आणि कट्टरतावाद मानवतेसाठी घातक असल्यावर दोन्ही देशांमध्ये एकमत असल्याचं प्रधानमंत्री मोदी यावेळी म्हणाले. द्विपक्षीय संबंधांमध्ये झालेल्या प्रगतीचा दोन्ही नेत्यांनी चर्चेदरम्यान आढावा घेतला.

पश्चिम आशिया संघर्ष

अमेरिकेसोबत वाटाघाटी करायला इराणने स्पष्ट शब्दात नकार दिला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चर्चेची तयारी दाखवली होती. त्यावर इराणचे लष्करी अधिकारी अली लारिजानी यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे. आतापर्यंत या युद्धात दोनशे जणांचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने सर्व राज्यांना पत्र पाठवून सावधगिरी बाळगण्याचं आवाहन केलं आहे. इराणच्या बाजूने बोलणाऱ्या कट्टरपंथी लोकांची ओळख पटवायला केंद्रीय गृहमंत्रालयाने सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना सांगितलं आहे. कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कठोर कारवाईची गरज यात व्यक्त करण्यात आली आहे. संघर्षाच्या पार्श्वभूमीवर एअर इंडियाने संयुक्त अरब अमिराती, सौदी अरेबिया, इस्रायल आणि कतारसाठी जाणारी आणि येणारी विमान उड्डाणं रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय युरोपला जाणारी काही निवडक उड्डाणंही रद्द करण्यात आली आहेत. युरोप आणि अमेरिकेला जाणारी विमानं पश्चिम आशियाच्या हवाई क्षेत्रातून न जाता पर्यायी मार्गांचा अवलंब करणार आहेत. सध्या इराणमधे वास्तव्याला असलेल्या जम्मू काश्मीरच्या विद्यार्थ्यांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी राज्य सरकार परराष्ट्र व्यवहार मंत्रालय, केंद्र सरकार यांच्या सतत संपर्कात आहे, असं मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी सांगितलं. त्यांनी नागरिकांना शांततेचं आवाहन केलं. दरम्यान,

पश्चिम आशियातल्या संघर्षामुळे दुबईमधे अडकून पडलेली भारतीय बॅडमिंटनपटू पी व्ही सिंधू उद्यापासून सुरू होणाऱ्या ऑल इंग्लंड चॅम्पीयनशीपला मुकणार आहे. सिंधुला सुरक्षित जागी हलवण्यात आलं आहे.

पर्यटक अडकले

यवतमाळचे दहा पर्यटक दुबई मध्ये अडकले आहेत. अमेरिका-इराण-इस्राईल युद्धाचा परिणाम आखाती देशांवर झालेला आहे, युद्धात हवाई हल्ले होत असल्यामुळे आंतरराष्ट्रीय विमानसेवा कोलमडली आहे. परिणामी दुबईत पर्यटनासाठी गेलेल्या यवतमाळच्या दहा पर्यटकांचे विमान रद्द झाल्याने ते दुबईतच अडकले आहेत. **24** फेब्रुवारीला ५ जण तर **26** फेब्रुवारीला दोन दाम्पत्य दुबईला गेले होते. एक विद्यार्थिनी देखील दुबईत आहे. येत्या दोन दिवसात हे सर्वजण परतणार होते मात्र युद्धामुळे त्यांच्या विमानाचे उड्डाण रद्द झाले. दरम्यान तिथे कुठलीही अडचण नसून परतीचे विमान कधी मिळेल हे निश्चित नसल्याचे पर्यटकांनी व्हिडिओद्वारे कळविले आहे. तर जिल्हा प्रशासनाने या पर्यटकांशी आणि त्यांच्या कुटुंबीयाशी संपर्क साधला.

शेअर बाजार

मध्य पूर्वेत सुरू असलेल्या युद्धामुळं जगभरातल्या शेअर बाजारात आज घसरण दिसून आली. देशातले शेअर बाजार मोठ्या घसरणीसह सुरू झाले. व्यवहार सुरू झाले तेव्हा काही क्षण सेन्सेक्स २ हजार ७०० आणि निफ्टी ५०० हून अधिक अंकांनी घसरले होते. त्यानंतर बाजार सावरले होते पण नंतर पुन्हा त्यात घसरण वाढत गेली. सध्या सेन्सेक्स सुमारे १ हजार ६०० अंकांनी घसरुन ७९ हजार ७०० च्या जवळ व्यवहार करतो आहे. तर निफ्टी सुमारे ५०० अंकांनी घसरुन २४ हजार ७०० च्या आसपास व्यवहार सुरू आहे. युद्धामुळं सोनं आणि चांदीच्या दरातही आज चांगली वाढ दिसून आली. २४ कॅरेट एक तोळा सोन्याचे दर १ लाख ७१ हजारांच्या पलीकडे तर २२ कॅरेट एक तोळा सोन्याचे दर १ लाख ६७ हजारांच्या पलीकडे गेले होते. एक किलो चांदीसाठी २ लाख ९५ हजार रुपये मोजावे लागत होते. भारतीय कमोडिटी बाजारात कच्चा तेलाचे दर प्रति बॅरल ५०० रुपयांनी वधारुन ५ हजार ६९६ रुपये प्रति बॅरल या सार्वकालिक उच्चांकी पातळीवर पोहोचले आहेत.या युद्धामुळं

कच्च्या तेलाचं उत्खनन एप्रिलमध्ये दिवसाला २ लाख ६ हजार बॅरेलनं वाढवण्याचा निर्णय ओपेक प्लस समुहातल्या देशांनी घेतला आहे.

एसबीएल स्फोट अपडेट

नागपूरमध्ये काटोल तालुक्यातील **SBL Explosive** कंपनीत झालेल्या स्फोटात मृत्यूंची संख्या **19** झाली असून **23** जखमींपैकी **13** जणांची प्रकृती गंभीर आहे. या कंपनीच्या सुरक्षा परीक्षण तसेच कामगारांचे परीक्षण या बाबींची जबाबदारी असणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या औद्योगिक सुरक्षा आणि आरोग्य संचालनालय, श्रम आयुक्तालय तसेच केंद्र सरकारच्या पेसो-पेट्रोलियम आणि विस्फोटक सुरक्षा संस्था या संस्थांमधील अधिकाऱ्यांची देखील जबाबदारी निश्चित करून ते दोषी आढळले तर त्यांच्यावर देखील कारवाई करण्यात येईल अशी माहिती नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज दिली.

*आज बैठकीमध्ये या ठिकाणी चार पाच विषयांवर निर्णय घेण्यात आला. एक तर **PESO** चे जे अधिकारी आहेत केंद्र सरकारचे जे अधिकारी आहेत आणि लेबर कमिशनरचे लोक आहेत. यांना यांची जबाबदारी फिक्स केली पाहिजे आणि त्यांची जबाबदारी फिक्स करून एखाद्या वेळी यांनी जे त्या ठिकाणी मागच्या वर्षाभरात दोन वर्षांमध्ये जे काही इन्स्पेक्शन करायला पाहिजे, जे काही सेफ्टी मेजर घ्यायला पाहिजे, जे काही डिपार्टमेंट म्हणून काम करायला पाहिजे ते केलं नाहीये. त्यामुळे आमच्या विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि एस पी यांची जबाबदारी फिक्स करतील आणि गरज पडली यांच्यावरही त्या ठिकाणी त्या गुन्ह्यामध्ये यांना समाविष्ट करता येईल का, जो गुन्हा दाखल केला आहे याचाही विचार या ठिकाणी आमच्या सर्व आमदार खासदारानी मागणी केली आहे.*

नागपूर विभागीय कार्यालयात या स्फोटाबद्दल घेण्यात आलेल्या उच्चस्तरीय आढावा बैठकीत झालेल्या निर्णयांबद्दल ते प्रसार माध्यमांना माहिती देत होते. या दुर्घटनेत मृत्युमुखी पडले त्यांच्या कुटुंबीयांना कंपनीतर्फे 75 लाख केंद्र शासनातर्फे 2 लाख आणि राज्य शासनातर्फे 5 लाख असे एकूण 82 लाख रुपये एकत्रित मिळणार

असून ते मुलांच्या भविष्याकरिता त्यांच्या पाल्यांच्या नावावर करण्यात येणार आहेत. या घटनेचा प्राथमिक अहवाल प्राप्त झाला असून हा प्रकार केवळ निष्काळजीपणामुळे घडला आहे. पुढील एका महिन्यात संपूर्ण रिपोर्ट प्राप्त होईल असे देखील त्यांनी स्पष्ट केलं. गेल्या वर्षभरात नागपूर मध्ये अशा प्रकारच्या स्फोटात 44 मृत्यू तर 48 लोकं जखमी झाले आहे. या घटनेचा चौकशी अहवाल केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांच्याकडे विभागीय आयुक्तांद्वारे पाठवण्यात आला असून त्यांनी कारवाईचे आश्वासन दिले असल्याचेही बावनकुळे यांनी सांगितले.

गडकरी मनपा कार्यक्रम

नागपूर महानगरपालिकेने गेल्या **75** वर्षांमध्ये अनेक आघाड्यांवर मोठ्या सुधारणा केल्या असून लोकाभिमुख प्रशासन देण्याचा प्रयत्न केला आहे. याशिवाय गेली इतकी वर्ष विविध महत्त्वाच्या टप्प्यांसह नागपूर महानगरपालिकेला वैभवशाली इतिहास प्राप्त झाल्याचं प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं आज नागपूर महानगरपालिकेच्या **75** वर्षपूर्ती निमित्त परिसरात माजी महापौर आणि नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला त्या कार्यक्रमात उपस्थित त्यांना संबोधित करताना ते बोलत होते. नगरसेवक यांचे कार्य अत्यंत कठीण असल्याचे सांगून लोकाभिमुख असतानाच सर्व घटकातील लोकांच्या आशा अपेक्षा पूर्ण करण्याची जबाबदारी त्यांच्यावर असते असे ते म्हणाले. यावेळी महानगरपालिका आयुक्त डॉक्टर अभिजीत चौधरी यांच्यासह माजी महापौर, नगरसेवक, महानगरपालिकेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

होळी -शिमगा

राज्यात सर्वत्र आज होळी अर्थात शिमग्याचा सण साजरा केला जात आहे. आज संध्याकाळी ठिकठिकाणी होलिका दहन करण्यात येईल, हे वाईटावर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक असून, हा पवित्र उत्सव सत्य, श्रद्धा आणि सकारात्मकतेची शक्ती अधोरेखित करतो. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी होळी आणि धुलीवंदनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांनी प्रेम, स्नेह आणि बंधुभावाचे प्रतीक असलेला रंगोत्सव

आनंदाने साजरा करावा, तसंच पर्यावरण रक्षणाबद्दलही जागरुक राहण्याचं आवाहन केलं आहे.

<u>होळी बाजारपेठ</u>

गोंदिया जिल्ह्यात आज २ हजार ९००हून अधिक ठिकाणी होळी साजरी केली जाणार आहे. इथल्या भगवान खाटू श्याम बाबांच्या भक्तांनी होळीपूर्वीच धुळवड साजरी केली आहे. नैसर्गिक रंगांचा वापर करून धार्मिक गीतांवर जल्लोष करत ही होळी साजरी केली जात आहे.

****